# Navprabha

Date : 10-Apr-08
Headline ; Arthaeon starts Artha Money Service
Event : Press conference to announce the launch of Arthaeon Financial Services
Location : Mumbai

## ‘अर्थइऑन’तर्फे ‘अर्थमनी’ सेवा सुरू

■ पणजी ■

‘अर्थइऑन फायनान्शिअल सर्व्हिसेस कंपनीने भारतात किरकोळ वित्तीय सेवा क्षेत्रात अर्थमनी नावाची एक आगळी वेगळी सेवा सुरू केली आहे. ही सेवा म्हणजे विविध वित्तीय उत्पादने एकाच ठिकाणी मिळणारे एक मनीसुपरमार्केटच ठरणार आहे. प्रत्येक भारतीय ग्राहकांस मग तो निवासी असो वा अनिवासी ही सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. अर्थमनी सेवा कंपनीच्या सर्व शाखा, वितरण शृंखला, इंटरनेट व टेलिफोन माध्यमाव्दारे उपलब्ध करण्यात आली आहे.




एकाच छताखाली सर्वप्रकारची वित्तीय उत्पादने उपलब्ध झाल्यामुळे ग्राहकांना विविध उत्पादनांचा तुलनात्मक अभ्यास करून सुयोग्य उत्पादन निवडण्याचे स्वातंत्र प्राप्त होणार आहे. वैयक्तिक वित्तीय उत्पादनांबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी अर्थमनीतर्फे प्रशिक्षित व्यवस्थापकांचीही नेमणूक करण्यात येणार आहे. अशाप्रकारची एकछत्री सेवा देणारी अर्थइऑन ही पहिलीच भारतीय कंपनी आहे. गेल्या तीन वर्षांपासून भारत ९ टक्के दराने विकास साध्य करीत असल्यामुळे वित्तीय सेवांना देशात अभूतपूर्व मागणी आली आहे. या मागणीपैकी काही भाग बँका, असेट मॅनेजमेंट कंपन्या व इन्श्युरन्स कंपन्यातर्फे पूर्ण केला जात आहे. पण प्रत्येक कंपनी एकट्या एकट्याने सेवा पुरवत आहे. अर्थमनी सेवा मात्र सर्वव्यापक सेवा देण्यास सज्ज आहे.